# ***<u>संगमेश्वरच्या कॉलेजच्या एनसीसी  कॅडेट्सची यशस्वी परंपरा कायम</u>***

सोलापूर दि.5-जुलै 2025

9 महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापुर आयोजित CATC - 703 व  CATC - 704 असे दोन NCC कॅम्प सहस्रार्जुन प्रशाला सोलापूर येथे घेण्यात आले होते. या कॅम्पमधील विविध स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या एनसीसी कॅडेट्सने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. यामधील CATC - 703  NCC कॅम्पचे प्रतिनिधित्व SUO इरफान तांबोळी व JUO प्रियंका राठोड या दोघांनी केले होते व CATC - 704 या NCC कॅम्पचे प्रतिनिधीत्व SUO दर्शन चिंचोलीकर व SUO सौंदर्या पुजारी या दोघांनी केले.

या एनसीसी शिबिरामध्ये मध्ये मुलांसाठी वॉलीबॉल ,रस्सीखेच, खो खो या स्पर्धेचा आयोजन करण्यात आले होते. मुलांमध्ये हॉलीबॉल मध्ये संगमेश्वर कॉलेजमधील एनसीसी कॅडेट्सना प्रथम क्रमांक मिळाला, तर रस्सीखेच या स्पर्धेमध्ये मुलींमधून संगमेश्वर कॉलेजला प्रथम क्रमांक मिळालेला आहे. तसेच खो-खो या स्पर्धेमध्ये मुलींमधून संगमेश्वर कॉलेजला द्वितीय क्रमांक मिळालेला आहे. वैयक्तिक प्रकारामध्ये रायफल शूटिंग स्पर्धेमध्येत CHM विवेक पानीभाते ने मुलांमधून फायरिंग मध्ये प्रथम क्रमांक पटकावला तर  मुलींमधून SGT अक्षता धर्मे हिने प्रथम क्रमांक मिळवला.या कॅम्पमधून बेस्ट वॉलेंटियर कॅडेट म्हणून CPL कल्याणी नागठाण या कॅडेटची निवड करण्यात आली.

तसेच याच कॅम्पमधून पुढील थलसेना कॅम्पसाठी फायरिंग मधून CPL वीट्टू पासवान व CHM विवेक पानीभाते यांची निवड झाली व अन्य प्रकारात CPL अथर्व धावडे, JUO मंजुनाथ स्वामी, CPL अनुज चव्हाण या एनसीसी निवड करण्यात आलेली आहे.

दरवर्षी संगमेश्वर कॉलेज मधील एनसीसी कॅडेट्सची राष्ट्रीय स्तरावर निवड होत असते. अशा या भरीव कामगिरीबद्दल बद्दल संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे  चेअरमन मा.श्री. धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी  मॅडम ,प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा ,उपप्राचार्य प्रसाद कुंटे ,डॉ. सुहास पुजारी ,डॉ.साहेबराव पाटील व एनसीसी विभागाच्या कॅप्टन शिल्पा लब्बा, लेफ्टनंट प्रा. तुकाराम साळुंखे यांनी सर्व कॅडेट्सचे अभिनंदन केले.

9 महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल रणधीर सतीश कुमार ,AO लेफ्टनंट कर्नल शरभ बाबर, सुभेदार मेजर सपकोटा JCO प्रदीप कदम , CHM विक्रमजीत सिंग व सर्व एनसीसी पी.आय स्टाफ यांनी  संगमेश्वर कॉलेजच्या एनसीसी कॅडेटचे अभिनंदन केले.


MANAGEMENT CHAMBER